# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.07.2024** **वार:शनिवार**

---

1. शिवरायांच्या शौर्याचं प्रतीक असलेली वाघनखं साताऱ्यामध्ये दाखल होणं महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे - यांचं प्रतिपादन आणि
2. मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमधील बिघाडामुळे जगभरातल्या अनेक देशांमध्ये - बँकिंग, विमान वाहतूक आणि अन्य सेवा विस्कळीत

यासह - इतर सविस्तर बातम्या,

**<u>मुख्यमंत्री-सातारा</u>**

शिवकालीन महाराष्ट्र हे भारताच्या इतिहासातील सोन्याचं पान आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थानं रयतेचे राजे होते. त्यांच्या शूरतेचं, वीरतेचं प्रतीक असलेली वाघनखं साताऱ्याच्या पवित्र भूमीत दाखल झाली आहेत हा महाराष्ट्रासाठी भाग्याचा दिवस आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केलं. साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात शिवशस्त्रशौर्यगाथा या उपक्रमा अंतर्गत शिवरायांची वाघनखं, समारंभपूर्वक प्रदर्शित करण्यात आली; तसंच अन्य शिवकालीन शस्त्रांच्या प्रदर्शनाचं उद्घाटनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते.

शिवरायांना अभिप्रेत असलेलं रयतेचं राज्य साकार करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्रातलेच नाही तर संपूर्ण देशातील नागरिक, ही वाघनखं पाहण्यासाठी येतील, आणि त्यातून प्रेरणा घेतील असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा वारसा सांगणाऱ्या वेल्हा तालुक्याचं नाव आता राजगड करण्यात आल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं.

सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी गड-किल्ल्यांचं पावित्र्य राखण्याचं आवाहन नागरिकांना केलं. या कार्यक्रमात शिवराज्याभिषेकाच्या 350 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त किल्ले रायगड, किल्ले सिंधुदुर्ग, छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा तसंच संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या भेटीचा प्रसंग अशा 4 टपाल तिकीटांचं अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलं.

**<u>मायक्रोसॉफ्ट</u>**

मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमध्ये झालेल्या बिघाडामुळे मायक्रोसॉफ्टची सॉफ्टवेअर प्रणाली काल ठप्प झाली होती, ती आता पूर्वपदावर येत आहे. यामुळे जगभरात अनेक देशांमध्ये बँकिंग, विमान वाहतूक आणि अन्य सेवा विस्कळीत झाल्या होत्या. भारतातही मुंबई विमानतळावरच्या सेवेला याचा सर्वाधिक फटका सहन करावा लागला. विविध विमान कंपन्यांना आपली विमान उड्डाणं रद्द करावी लागली.

अमेरिकेतली सायबर सुरक्षा पुरवणारी कंपनी क्राउड-स्ट्राइकशी या यंत्रणा ठप्प होण्याचा संबंध असल्याचं वृत्त आहे. सुरक्षा तपशील संकलनासाठी कंपनीचा फाल्कन सेन्सर बसवलेल्या विविध व्यावसायिक यंत्रणांमध्ये बिघाड झाल्याचं कंपनीनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. यासंदर्भात मायक्रोसॉफ्ट आणि त्यांच्या सहयोगी कंपन्यांच्या संपर्कात असल्याचं, केंद्रिय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल सांगितलं.

दरम्यान, मायक्रोसॉफ्ट यंत्रणा बिघाडाचा केवळ 10 बँका आणि वित्तीय संस्थांच्या कामकाजावर किरकोळ परिणाम झाल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. देशातल्या बहुतांश बँकांच्या महत्त्वाच्या संगणकीय यंत्रणा क्लाउड काम्प्युटिंगचा वापर करत नाहीत. मोजक्या बँकाच ही यंत्रणा वापरत असल्यामुळे त्यांच्या कामकाजावर थोडा परिणाम झाला - अशी माहिती, बँकेनं दिली आहे.

**<u>भाजपा</u>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकांना काही महिनेच राहिले असल्यानं राजकीय पक्षांच्या हालचालींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीचे घटक पक्ष आपली रणनीती ठरवण्यासाठी बैठका घेत आहेत. महायुतीतले घटक पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहेत असं भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल सांगितलं. भाजपा पदाधिकाऱ्यांच्या 2 दिवसांच्या बैठकीनंतर ते काल पत्रकार परिषदेत बोलत होते. आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीनं सर्व स्तरांवर पक्ष संघटना मजबूत करण्याला प्राधान्य देणार असल्याचं ते म्हणाले. महाविकास आघाडीदेखील विधानसभा निवडणूक एकत्रच लढवेल असं काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणूगोपाल यांनी सांगितलं. काँग्रेसच्या वरीष्ठ नेत्यांची बैठक काल मुंबईत झाली त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. आघाडीतले तिन्ही घटक पक्ष मिळून जागावाटपावर चर्चा करतील आणि येत्या 20 ऑगस्टपासून, विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुरू होईल असं वेणूगोपाल म्हणाले.

**<u>पूजा खेडकर</u>**

वादग्रस्त प्रशिक्षणार्थी प्रशासकीय अधिकारी पूजा खेडकरच्या विरोधात केंद्रीय लोकसेवा आयोगानं गुन्हा दाखल केला असून पोलिसांनी प्राथमिक चौकशी अहवालाची नोंद केली आहे. परीक्षेच्या नियमांचं उल्लंघन करत पूजा खेडकर यांनी स्वतःचं, वडिलांचं आणि आईचं नाव बदललं. तसंच छायाचित्र, स्वाक्षरी, ईमेल आयडी, मोबाईल क्रमांकासह पत्ता बदलून आपली खोटी ओळख दाखवल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. तसंच केंद्रीय लोकसेवा आयोगाची उमेदवारी रद्द करण्याबाबत कारणं दाखवा नोटीसदेखील जारी करण्यात आली आहे.

दरम्यान, पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यावर छळाचे आरोप केल्या संदर्भात पूजा खेडकर यांना आज पुण्यात, जबाब नोंदवण्यासंदर्भात  दुसरी नोटीस देण्यात आली आहे. त्यांना याआधी नोटीस देऊन काल उपस्थित राहायला सांगण्यात आलं होतं, मात्र त्या उपस्थित राहिल्या नव्हत्या. पूजाचे वडील दिलीप खेडकर यांना 25 जुलैपर्यंत अटकपूर्व जामीन पुणे सत्र न्यायालयाकडून मंजूर करण्यात आला आहे. मुळशी तालुक्यातील धडवली गावातील शेतकऱ्यांना बंदुकीचा धाक दाखवून धमकावल्याच्या गुन्ह्यात, दिलीप खेडकर सहआरोपी आहेत.

**<u>झिका-अहमदनगर</u>**

पुण्यात आणखी 3 जणांना झिकाचा संसर्ग झाला आहे. यामध्ये एका गर्भवतीसह 2 ज्येष्ठ नागरिकांचा समावेश आहे. शहरातल्या झिकाच्या रुग्णांची संख्या आता 27 झाली असल्याचं महापालिकेच्या आरोग्य विभागानं म्हटलं आहे.

यामध्ये 11 गर्भवती आहेत. दरम्यान, अहमदनगर जिल्ह्यात संगमनेर शहरातल्या 2 गरोदर महिलांचा झिका विषाणूचा अहवाल पॉझिटीव्ह आला आहे. या दोघींना कोणतीही लक्षणं नाहीत तसंच त्यांच्या गर्भाची प्रकृतीही चांगली आहे. मात्र खबरदारीचा उपाय म्हणून दोन दिवसांपासून पुन्हा नव्यानं संपूर्ण शहराचं सर्वेक्षण सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर बापूसाहेब नागरगोजे यांनी दिली. नागरिकांनी आपल्या घराच्या आवारात, सोसायटी, तसंच कार्यालय परिसरात पावसाचं पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

**उदय सामंत-रत्नागिरी**

राज्यातल्या 193 एसटी बसस्थानकांसाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून 600 कोटी रुपयांचा निधी देण्यात आल्याची माहिती रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली. रत्नागिरी तालुक्यात पाली इथे नव्यानं उभारण्यात आलेल्या एसटी बसस्थानकाचं लोकार्पण सामंत यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**पेयजल-नवीमुंबई**

'अमृत 2' प्रकल्पांतर्गत नळातून पेयजल यावरील राष्ट्रीय कार्यशाळेत नवी मुंबईतील नाविन्यपूर्ण जलदेयक वितरण आणि संकलन यंत्रणा या विषयावर नवी मुंबई महानगरपालिकेद्वारे सविस्तर सादरीकरण करण्यात आलं. पाणी देयक भरणं अधिक सुलभ होण्यासाठी युपीआय आणि क्यूआर कोडव्दारे सुविधा उपलब्ध करुन दिली जात आहे.

**कबड्डी**

पुण्यात सुरू असलेल्या 71 व्या राज्य कबड्डी अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत, महिला विभागात पुणे ग्रामीण संघानं सांगली संघावर 46-23 अशी मात करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. रत्नागिरी संघानं पालघर संघावर 26-24 असा निसटता विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली. तिसऱ्या सामन्यात मुंबई उपनगर पूर्व संघानं ठाणे शहर संघावर 33-15 अशी मात करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. अत्यंत अटितटीच्या झालेल्या चौथ्या सामन्यात पिंपरी चिंचवड संघानं पुणे शहर संघाचा 31-30 असा अवघ्या एका गुणाच्या फरकानं विजय मिळवत उपांत्य फेरीत धडक मारली.

**क्रिकेट**

महिलांच्या 20 षटकांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारतानं आपल्या पहिल्याच सामन्यात पाकिस्तानवर 7 गडी राखून विजय मिळवला. श्रीलंकेत डंबुला इथे पाकिस्ताननं प्रथम फलंदाजी करताना सर्व गडी बाद 108 धावा केल्या. स्मृती मन्धना आणि शेफाली वर्माच्या फलंदाजीमुळे 35 चेंडू शिल्लक असताना भारतानं विजय मिळवला. केवळ 20 धावा देत पाकिस्तानचे 3 गडी बाद करणारी दीप्ती शर्मा सामनावीर ठरली.

**पाऊस**

गडचिरोली जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातल्या नद्या नाल्यांना पूर आला आहे. जिल्ह्यातल्या आलापल्ली-भामरागड, एटापल्ली-गट्टा-आलदंडी आणि चोखेवाडा-एटापल्ली-आलापल्ली या तीन मार्गांवरची वाहतूक ठप्प झाली आहे.

भंडारा जिल्ह्यातल्या गोसेखुर्द प्रकल्पाचे 9 दरवाजे उघडण्यात आले असून, धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे; गडचिरोली जिल्ह्यातील चिचडोह बंधाऱ्यातून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात धरणातून होणारा पाण्याचा विसर्ग वाढल्यामुळे नद्यांच्या पाणीपातळीत झपाट्यानं वाढ होत आहे. जिल्ह्यातले 74 बंधारे पाण्याखाली गेले आहेत. जिल्ह्यातली चारही धरणं पूर्ण क्षमतेनं भरली आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनानं नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात कालही दिवसभर दमदार पाऊस पडला. रात्री आठच्या परिस्थितीनुसार, खेडमधली जगबुडी आणि राजापूरची कोदवली, या नद्या इशारा पातळीच्या वरून वाहात आहेत.

सांगली जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागात बेंदूर सण मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून महत्व असलेल्या पशुपालनाबद्दल आदर, प्रेम व्यक्त करणारा सण म्हणजे बेंदूर, यानिमित्त ग्रामीण तसंच शहरी भागात बैलांना रंगवून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी बैलाच्या सहाय्यानं शेती केली जाते.

**हवामान**

येत्या 24 तासात  राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता असून कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार ते अती जोरदार पाऊस पडेल असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.